क्र.२/नसवि/महासभा/ ०४ /२०२१-२०२२
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- १२ ऑगस्ट २०२१

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका सभा क्रमांक - ०४ /२०२१-२०२२

## महानगरपालिका सभेची नोटीस (ऑनलाईन ॲपद्वारे)

प्रति,
मा. ______________________

सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मधील तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शुक्रवार दि.२०/०८/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली येथे मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.२८ जून २०२१ रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन ॲपद्वारे आयोजित केली आहे.** या सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी आपण सदर सभेस ऑनलाईन सहभागी व्हावे हि विनंती.

**सदर ऑनलाईन (Zoom App) सभेसाठी मिटींग आयडी-४१५६८०३७९० पासवर्ड-१२३४५ असा आहे.**

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.१९/०७/२०२१ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवट्याचे ठराव. ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिका स.नं.४४/१अ, ४४/२अ, ४४/३अ व क मधील परिसरास पाटील मळा असे नामकरण करणेस नामकरणाचा प्राथमिक इरादा प्रसिद्ध करणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१२/०७/२०२१ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा आणि त्यांचे नावे असलेले मिरजेतील उद्यान या चौकास भारतीय संविधान चौक असे नामकरण करणेस अंतीम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०२/०७/२०२१ चे विषयपत्र.**

६. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये महाराष्ट्र शासन असाधारण राज्यपत्र दि.१४ जानेवारी २००९ अन्वये मालमत्ता कराची आगाऊ रक्कम भरणाऱ्या मालमत्ता धारकांना सामान्य करात सुट देणेबाबत **उपायुक्त (कर निर्धारक व संकलक विभाग) यांचे दि.१६/०६/२०२१ चे विषयपत्र.**

७. महापालिका कार्यक्षेत्रातील पंचतारांकीत (५ स्टार) घरे अभियांनातर्गत पंचतारांकीत घरांचा दर्जा प्राप्त करणाऱ्या घरांना घरपट्टी मध्ये सामान्य करात कायम स्वरुपी सुट देणेबाबत **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१०/०६/२०२१ चे विषयपत्र.**

८. महापालिकेच्या मिरज हायस्कूल मिरज या मान्यता प्राप्त अनुदानीत माध्यमिक शाळेकरीता शालेय समितीचे गठण करणेबाबत **मुख्याध्यापक (मिरज हायस्कूल मिरज) यांचे दि.३०/०४/२०२१ रोजीचे विषयपत्र.**

९. महानगरपालिकेचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नामनिर्देशित सदस्य श्री.सागर रामचंद्र घोडके यांनी दि.१२/०७/२०२१ रोजी आपल्या नामनिर्देशित सदस्य पदाचा राजीनामा दिलेला असल्याने, त्यांचे रिक्त झालेल्या जागेवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे गटनेता यांचेवतीने नामनिर्देशनाद्वारे नविन सदस्य नियुक्त करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.०९/०८/२०२१ चे विषयपत्र.**

... २ ...

१०. महापालिका स्थायी समिती सदस्य श्री.दिग्विजय प्रदीप सूर्यवंशी यांनी आपल्या स्थायी समिती सदस्य पदाचा दि.११/०८/२०२१ रोजी राजीनामा दिला असल्याने, त्यांचे रिक्त झालेल्या जागेवर उर्वरित कालावधीसाठी नविन स्थायी समिती सदस्य नियुक्त करणेसाठी गटनेता, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांचेमार्फत नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणेकामी **उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दिनांक ११/०८/२०२१ रोजीचे विषयपत्र.**

११. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (४) अन्वये स्थायी समितीच्या दि. ०१ सप्टेंबर २०२१ रोजी निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी त्या-त्या पक्षाच्या नविन आठ सदस्यांची कलम ३१ (अ) मधील तरतुदीनुसार भारतीय जनता पार्टी -०४, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष-०२ आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी -०२ असे एकूण ०८ सदस्यांची गटनेता,भारतीय जनता पार्टी,विरोधी पक्षनेता,भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, गटनेता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांचेमार्फत नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणेकामी **उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दिनांक १०/०८/२०२१ रोजीचे विषयपत्र.**

१२. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

१३. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौरसो यांचे मान्यतेने वितरीत

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**(टिप - मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.२८ जून २०२१ रोजीचे पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन ॲपद्वारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रियेसंदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा.सदस्यांनी महापालिका सिस्टीम मॅनेंजर यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.)**

**संपर्क क्रमांक :- श्री.नकुल जकाते सिस्टीम मॅनेंजर, भ्रमणध्वनी.क्र.९८२२१८५९२९**

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०८/२०२१

**महासभा क्रमांक :- ०४**

ठराव क्रमांक :- ९६

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१२/०७/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील स.नं.४४/१अ, ४४/२अ, ४४/३अ व क मधील परिसरास पाटील मळा असे नामकरण करणेस नामकरणाचा प्राथमिक इरादा स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करणेस व त्याकामी येणारे अनुषंगिक खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. उमेश पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

अनुमोदक :- श्री. मैनुद्दीन बागवान.

महापौर,

मोहम्मद बागवान

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०८/२०२१

ठराव क्रमांक :- ८७

विषय क्रमांक :- ०५

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०२/०७/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका विभागीय कार्यालय,मिरज येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा आणि त्यांचे नावे असलेले मिरजेतील उद्यान या चौकास भारतीय संविधान चौक असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतीम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. उमेश पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

अनुमोदक :- श्री. मैनुद्दीन बागवान महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०८/२०२१

ठराव क्रमांक :- ९८

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (कर निर्धारक व संकलक विभाग) यांचे दि.१६/०६/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये महाराष्ट्र शासन असाधारण राज्यपत्र दि.१४ जानेवारी २००९ अन्वये मालमत्ता कराची आगाऊ रक्कम भरणाऱ्या मालमत्ता धारकांना सामान्य करात सुट देणेची महासभा ठराव क्र.८६ दि.२०/०१/२०२१ अन्वये सुरु केलेली योजना सन २०२१-२२ पासून पुढील कालावधीसाठी सुरु ठेवणेबाबत ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

१. मालमत्ता धारकांना बिले दिल्यानंतर जे मालमत्ता धारक ३० दिवसात वर्षाची संपूर्ण मागणी रक्कम एक रकमी भरणा करतील,अशा नागरिकांना त्यांचे सामान्य करात १०% सूट देणेत यावी.

२. मालमत्ता धारकांना बिले दिल्यानंतर जे मालमत्ता धारक ६० दिवसात वर्षाची मागणी रक्कम एक रकमी भरणा करीता अशा नागरिकांना त्यांचे सामान्य करात ५% सूट देणेत यावी.

३. तसेच, पर्यावरण संतुलनासाठी **अ**) सौर ऊर्जेचा वापर करणे **ब**) गांडूळ खत प्रकल्प राबविणे **क**) रेन वॉटर हार्वेस्टींग करणे **ड**) होम कंपोस्टींग करणे **इ**) सांडपाण्याचा निचरा करणे या पाच बाबींपैकी तीन बाबींची पुर्तता केल्यास त्या मिळकतीस सामान्य करामध्ये ४% सवलत देणेस ही सभा मान्यता देत असून, पर्यावरण संतुलनासाठी सवलत देणेसाठी **अ** ते **इ** बाबतचा दाखला वैद्यकीय आरोग्याधिकारी यांचेकडून प्रमाणित करुन घेवून, सदर सवलत देणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. उमेश पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. मैनुद्दीन बागवान

D P Suryavanshi

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०८/२०२१

ठराव क्रमांक :- ८९

विषय क्रमांक :- ०७

---

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१०/०६/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका कार्यक्षेत्रातील स्वच्छ सर्व्हेक्षण मोहिमेंतर्गत पंचतारांकीत (५ स्टार) घरे अभियांनातर्गत पंचतारांकीत घरांचा दर्जा प्राप्त करणाऱ्या घरांना महासभा ठराव क्र.८६ दि.२०/०१/२०२१ अन्वये सामान्य करात ४% सवलत देणेची सुरु केलेली योजना सन २०२१-२२ पासून पुढील कालावधीसाठी सुरु ठेवणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.उमेश पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

अनुमोदक :- श्री.मैनुद्दीन बागवान

महापौर,

१) कार्यालयीन टिपणी
२) वै.आ.अ.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०८/२०२१

**महासभा क्रमांक :- ०४**

ठराव क्रमांक :- ९०

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे मुख्याध्यापक (मिरज हायस्कूल मिरज) यांचे दि.३०/०४/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिकेच्या मिरज हायस्कूल मिरज या मान्यता प्राप्त अनुदानीत माध्यमिक शाळेकरीता शालेय समितीचे गठण करणेबाबत प्रशासनाकडून सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर झाले चर्चेनुसार ही सभा सदरचा प्रस्ताव प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :- श्री. उमेश पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर

D/ Suryavanshi

अनुमोदक :- श्री. मैनुद्दीन बागवान

महापौर,

मुख्याध्यापक
मिरज हायस्कूल

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०८/२०२१

ठराव क्रमांक :- ९१

विषय क्रमांक :- ०९

---

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.११/०८/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशीत सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ मधील कलम ३ मध्ये सार्वत्रिक निवडणूकीनंतर निवडणूकीचे निकाल अधिसूचित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्यानंतर लगतच घेण्यात येणाऱ्या महापालिकेच्या बैठकीत, पाच व्यक्तींचे नामनिर्देशीत पालिका सदस्य म्हणून महानगरपालिका करील अशी तरतुद असल्याने, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीनंतर नगरमंडळ अस्तित्वात आलेवर अधिनियमातील कलम ४ अन्वये एकाद्या व्यक्तीकडे पालिका प्रशासननाचे विशेष ज्ञान अथवा अनुभव असेल ती व्यक्ती नामनिर्देशीत पालिका सदस्याच्या पदासाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशीत केली जाणेस पात्र असेल अशी अर्हता निश्चित करणेत आलेनुसार मा.महासभेच्या मान्यतेने पक्षीय तौलनिक संख्याबळानुसार पाच नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करणेत आली होती.

तद्नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नामनिर्देशित सदस्य श्री.आयुब मुसा बारगीर यांनी सदस्य पदाचा राजीनामा दिल्यानंतर मा.महासभा ठराव क्र.१२० दिनांक २०/११/२०१९ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१ (अ) मधील तरतुदीमधील शिफारशीनुसार सदर रिक्त जागेवर श्री.सागर रामचंद्र घोडके, सांगली यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नामनिर्देशित सदस्य पदी निवड करणेत आलेली होती. श्री.सागर रामचंद्र घोडके यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७ अन्वये पक्षाच्या पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार दि.१२/०७/२०२१ रोजी नामनिर्देशित सदस्य पदाचा स्वखुशीने मा.आयुक्तसो यांचेकडे राजीनामा सादर केलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशीत सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ चे कलम ७ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या नामनिर्देशित सदस्य पदाच्या रिक्त झालेल्या जागी नामनिर्देशित सदस्य म्हणून नामनिर्देशन करणेसाठी अधिनियमातील तरतुदीनुसार नामनिर्देशनासाठी आवश्यक असणारी अर्हता विचारात घेवून, नामनिर्देशित सदस्य नियुक्त करणेकामी श्री.सागर रामचंद्र घोडके यांचे रिक्त झालेल्या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेता यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१ (अ) मधील तरतुदीनुसार केले शिफारशीनुसार सदर रिक्त जागेवर श्री.पाटील हरिदास पंडीत यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्विकृत सदस्य पदी निवड करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. उमेश पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री. मैनुद्दीन बागवान

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४**

दिनांक :- २०/०८/२०२१

ठराव क्रमांक :- ९२

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.११/०८/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मा.महासभा ठराव क्र.४३ दि.१८/०९/२०२० अन्वये श्री.दिग्विजय प्रदीप सूर्यवंशी राष्ट्रवादी काँग्रेस यांची स्थायी समिती सदस्य म्हणून नियुक्ती करणेत आलेली होती. श्री.दिग्विजय प्रदीप सूर्यवंशी यांनी त्यांच्या स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दि.११/०८/२०२१ रोजी दिलेला असल्याने, त्यांची जागा रिक्त झालेली आहे. सदर जागेवर अधिनियमातील तरतुदीनुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे एका सदस्याची उर्वरित कालावधीसाठी नियुक्ती करणे आवश्यक असल्याने, श्री.दिग्विजय प्रदीप सूर्यवंशी यांनी राजीनामा दिल्याने, रिक्त झाले एका जागेवर उर्वरित कालावधीसाठी अधिनियमातील तरतुदीनुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते यांनी बंद लखोट्याद्वारे लेखी दिले पत्रानुसार श्री.सरगर मनगू केरु यांची स्थायी समिती सदस्य म्हणून नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत असून, त्याप्रमाणे नोंद घेवून योग्यती पुढील कार्यवाही प्रशासनाने ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. उत्तम साखळकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते.

D.P.Suryavanshi

महापौर,

स्थायी समिती विभाग

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०४** दिनांक :- २०/०८/२०२१

ठराव क्रमांक :- **९३**

विषय क्रमांक :- ११

---

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.१०/०८/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०१८ मध्ये होवून, सार्वत्रिक निवडणूकीनंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (२) अन्वये सोळा सदस्यांची महासभा ठराव क्र.५१ दि.१०/०९/२०१८ अन्वये अधिनियमातील तरतुदीनुसार तौलनिक संख्याबळानुसार स्थायी समितीवरील सोळा सदस्यांची नियुक्ती होवून, स्थायी समिती अस्तित्वात आली.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०(३) अन्वये महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारनंतर स्थायी समिती वरील निम्मे सदस्य निवृत्त होतील. अशी तरतुद आहे. त्यामुळे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकचे पहिली महासभा दि.१०/०९/२०१८ रोजी झाल्याने, विद्यमान स्थायी समिती मधील निम्मे सदस्य म्हणजे आठ सदस्य अधिनियमातील कलम २०(४) मध्ये विनिर्दिष्ठ केलेल्या त्यांच्या तारखेपूर्वी स्थायी समितीचा सभापती ठरविल अशा वेळी व अशा रितीने चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल आणि त्यानंतर पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळापर्यत असतील ते निवृत्त होतील. त्यानुसार स्थायी समिती मध्ये जास्त काळापर्यत काम केलेले आठ सदस्य दि.०१/०९/२०२१ रोजी निवृत्त झाल्याने, अधिनियमातील तरतुदीनुसार तौलनिक संख्याबळानुसार भारतीय जनता पार्टीचे ०४ सदस्य, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ०२ सदस्य आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ०२ असे एकूण ०८ सदस्यांची नियुक्ती करणेकामी संबंधीत गटनेते यांनी बंद लखोट्याद्वारे लेखी दिले पत्रानुसार खालील सदस्यांची स्थायी समिती सदस्य म्हणून नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. कोळेकर कल्पना कल्लाप्पा | भारतीय जनता पार्टी |
| २. | मा.ठोकळे जगन्नाथ बापू | भारतीय जनता पार्टी |
| ३. | मा.अलदर गजानन शिवाजी | भारतीय जनता पार्टी |
| ४. | मा.आवटी निरंजन सुरेश | भारतीय जनता पार्टी |
| ५. | मा.पाटील संतोष शिवदास | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष |
| ६. | मा.पठाण फिरोज हुसेन | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष |
| ७. | मा.सय्यद नर्गिस शमशोद्दीन | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ८. | मा.हारगे संगिता अभिजीत | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |

वरील प्रमाणे नोंद घेवून योग्यती पुढील कार्यवाही प्रशासनाने ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. उत्तम साखळकर — ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते — महापौर,